बुधवार, दि ११ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ११ वे ● अंक ५२ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# गुप्तता... की गुप्त माहितीच मिळेना?

## गुटखा बंदीची ऐशीतैशी; कारवाईला मुहूर्त मिळेल का?

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यासह शहरात विविध ठिकाणी प्रतिबंधित गुटखा सर्रास विकल्या जात असून याबाबत युवा आदर्शने वेळोवेळी वृत्त प्रकाशित केले आहे. असे असले तरी अन्न व औषधी प्रशासनासह पोलीस प्रशासनावर कोणताही परिणाम झालेला दिसून येत नाही. जालना शहरातील भोकरदन नाका परिसरात तर गुटखा किंगने आपली पाळेमुळे घट केलेली आहे. याच परिसरातून तो आपले व्यवहार सुरळीत चालवतोय. मात्र याची साधी भनक प्रशासनाला लागत नाही हे न कळण्यासारखे मुळीच नाही. कालच शहरातील बाजारपेठेत एका कारमध्ये दीड लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला कारच्या किमतीमुळे हा आठ लाखांचा मुद्देमाल म्हणवला गेला. याबाबत पोलीस प्रशासनाला गुप्त माहिती मिळाली होती आणि त्या गुप्त माहितीच्या आधारावर पोलीसांनी सापळा रचुन कारवाई केली व कारमधील विविध प्रकारचा गुटखा आणि सुगंधित तंबाखू ताब्यात घेतली. जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात प्रतिबंधीत गुटखा विक्री-वाहतुकीबाबत गुन्हे दाखल आहेत. आणि आठ-पंधरा दिवसांआड अशा छोट्या-मोठ्या कारवाया अन्न व औषधी प्रशासनासह पोलीस प्रशासन करत आहे. मात्र, ही कारवाई थोकडी ठरत असल्यामुळे गुटखा विक्रेत्यांचे फावते आहे. सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या भोकरदन नाका पोलीस चौकीच्या नाकावर टिच्चून एक गुटखा किंग आपला व्यवहार चालवत आहे. या परिसरातील अनेक पान टपऱ्यांवर बेदिक्कत गुटखा विक्री सुरु आहे. गुटखा विकणाऱ्यांकडुन अथवा माहितीच पोहचत नाही. हे म्हणजे सरळसरळ कानाडोळा करण्यापलिकडे दुसरेतिसरे काही नाही. मुळात भरणा,



भोकरदन नाका परिसरातील गुटखा किंग कडुन गुटख्याची विक्री होत असतांना एवढी गुप्तता पाळली जात आहे की पोलीसांच्या गुप्त माहितीदारांपर्यंत याची हफ्ता, पीएसटी (पोलीस सर्व्हीस टॅक्स) यासारखे शब्द प्रचलित असून पोलीसांची प्रतिमा मलिन करत आहेत. भोकरदन नाक्यावरील त्या गुटखा किंगची माहिती पोलीसांपर्यंत पोहचविण्यात गुप्त बातमीदार कमी पडताहेत की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मुळात या गुटखा किंगच्या पाठीशी राजकीय वरदहस्त? अथवा एखादा चिरीमिरीसाठी चौथा स्तंभास बदनाम करणारा कोणी आहे याचीही कल्पना पोलीसांना नाही? असे शक्य नाही. मुळात पोलीसांना या गुटखा किंगबाबत गुप्तता पाळायची आहे म्हणून अद्यापपर्यंत त्याबाबत काही गुप्त माहिती त्यांना नाही, असे म्हंटल्यास वावगे ठरणार! गुप्तता पाळणाऱ्या गुटखा किंगवर कारवाईसाठी वरिष्ठ पातळीवरून हालचाली झाल्यास पोलीसांना कारवाईला मुहूर्त मिळण्याची शक्यता आहे अन्यथा तेरी भी चुप मेरी चुप प्रमाणे जैसे थे ची परिस्थिती राहिल.

---

युवा आदर्श

### गौरी आगमन...

आधी येई गजानन
आता गौरी आगमन
भरुन गेला देव्हारा
भारावून आले मन
सणवार अर्थ पूर्ण
संस्कृती आपले धन
जपता नाती ज्योती
निर्धन होतो सधन
सजावटी आकर्षण
जागे होई कला गुण
पक्वान्न नवनाविन्य
रे पाककला निपुण
चाले भजन किर्तन
करती गायन नर्तन
नाती जुळती नवीन
होईलं सुरेख वर्तन
निमित्ते एकत्र जमावे
जमवावे आनंद क्षण
नात्यांची होई गुफंण
सणाचे आपणा ऋण
समजून घ्याव्या प्रथा
धर्मा शास्त्रीय कारण
उत्सव भरतो उत्साह
होणारं कलह हरण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

राजे शिवाजी गणेश मंडळकडून स्त्री शक्तीचा सन्मान

## अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना महाआरतीचा मान



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील प्रसिद्ध राजे शिवाजी गणेश मंडळाकडून मागील अनेक वर्षापासून मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रामधन पा.कळंबे यांच्या मार्गदर्शनाखाली तथा मंडळाच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, या भावनेतून गणेशोत्सवानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या राजे शिवाजी गणेश मंडळातर्फे यावर्षी सन्मान स्त्री शक्तीचा या उपक्रमांतर्गत शासनाच्या महिला व बालविकास यासंबंधी सदृढ बालक तथा निरोगी व सदृढ माता अभियान, बालकांचे पूर्वप्राथमिक शिक्षण अशा समाजोपयोगी कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना महाआरतीचा मान देऊन त्यांच्या महिला व बालकल्याण, शैक्षणिक व सामाजिक सेवेबद्दल मंडळातर्फे यथोचित सत्कार व सन्मान करण्यात आला. मंडळाच्या या उपक्रमाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून गणेश मंडळांनी **पान ३ वर**

---

## शिक्षण विभागाच्या भोंगळ कारभाराची प्रचिती

एका शाळेचे गुण दुसऱ्या शाळेच्या नावावर; तांत्रिक चुक, सुधारणा करणार- केंद्रप्रमुख




**परतूर । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा योजने अंतर्गत शाळांची तपासणी सध्या केंद्र स्तरावर सुरू आहे. या योजनेत सहभाग नोंदवलेल्या तालुक्यातील सर्व शाळांची तपासणी करण्याची जबाबदारी केंद्र प्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. केंद्र प्रमुखाने स्वतः चे केंद्र वगळून इतर केंद्रातील शाळा तपासण्यासाठी गट शिक्षणाधिकाऱ्यानी आदेश काढले आहेत. वाटूर केंद्रात येणाऱ्या जिला परिषद प्राथमिक शाळा दहिफळ भोंगाने पश्चिम या शाळेचे गुण दुसऱ्या शाळेच्या नावावर नोंदविण्यात आले आहेत. सर्व उपक्रमात **पान ३ वर**

---

## गणेशोत्सवानिमित्त शुक्रवारपासून चार दिवस प्रसादी

### देखाव्याचा खर्च टाळून बडी सडकचा राजा गणेश मंडळाचा अन्नदानाचा निर्णय

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील बडी



सडक च्या नावाने प्रसिद्ध असलेल्या बडी सडक चा राजा गणेश मंडळातर्फे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही देखाव्याचा खर्च टाळून शुक्रवार ( ता. १३) पासून सलग चार दिवस भाविकांना प्रसाद वितरित केला जाणार आहे.

बडी सडक चा राजाचे यंदा १६ वे वर्ष आहे. गणपती बाप्पांची आकर्षक मूर्ती बसविण्यात आली असून शुक्रवारी ( ता. १३) सायंकाळी चने, मटकी, वटाणे मिक्स मसाला भेळ, शनिवारी ( ता. १४) एकादशीनिमित्त रोज मिल्क शेक, रविवारी ( ता. १५) चायनीज भेळ, सोमवारी ( ता. १६) पावभाजी वाटप केली जाईल. दररोज पाच ते सात हजार भाविकांना प्रसादाचे वाटप केले जाणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाचे सदस्य संदीप गिंदोडिया, आदित्य बगडिया, निलेश भारूका, राहुल अग्रवाल, भूषण तवरावाला, सचिन चौधरी, निखिल जैस्वाल, प्रितेश मालपाणी, रघु भक्कड, रुपेश बगडिया, वेनूगोपाल डागा, दिपक पहाडे, संदेश लव्हाडे, विशाल कामड, अजय बगडिया, चेतन चोरडिया, भूषण देवीदान, डॉ. प्रतिक लाहोटी, रोहित गौड, कपिल गोरांत्याल, जितेश तलरेजा, अमित ठक्कर, अनिल चावला, जिगर शाह, चेतन अग्रवाल यांच्यासह मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



झाडे लावा झाडे जगवा

# संपादकीय

## भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज १२९ वि जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०-३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते. १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले.

**श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे, ९९२२५४६२९५**

# गौरी आवाहन ते गौरी विसर्जन!

अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. याला गौरी गणपती किंवा महालक्ष्मी पूजन देखील म्हटले जाते. यंदा २०२४मध्ये दि.१० सप्टेंबर रोजी गौरी आव्हान तर दि.११ सप्टेंबर रोजी गौरी पूजन आणि दि.१२ सप्टेंबर रोजी गौरी विसर्जन आहे. गौरीच्या पूजेची पद्धत आणि परंपरा सगळीकडे वेगवेगळी आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा ज्ञानवर्धक संकलित लेख वाचक सेवेत प्रस्तुत...

अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया भाद्रपद मासात गौरींचे पूजन करतात. तीन दिवस साजरा केल्या जाणार्या या पूजेत भाद्रपद शुक्ल पक्षाच्या षष्ठीला ज्येष्ठा गौरीचे आवाहन केले जाते. दुसर्या दिवशी पूजन व नैवेद्य तसेच तिसर्या दिवशी विसर्जन करतात. भाद्रपद महिन्यात अनुराधा नक्षत्रात महालक्ष्मी म्हणजे गौरीची चित्रे किंवा आपल्या परंपरेनुसार चिन्हे ठेवली जातात. ज्येष्ठ नक्षत्रात महालक्ष्मीची पूजा करुन महानैवेद्य दाखवले जाते. तिसर्या दिवशी ते मूळ नक्षत्रात गौरीचे विसर्जन करण्यात येते. गौरीला महालक्ष्मी ही म्हटलं जाते आणि ज्येष्ठ नक्षत्र म्हणून पूजले जाते म्हणून याला ज्येष्ठा गौरी पूजन असे संबोधले जाते. वाचकांसाठी ज्येष्ठा गौरी आरती ३ कडवे संपूर्ण लेखात देत आहे-

भाद्रपद शुद्ध सप्तमीस प्रतिष्ठा ।  
अनुराधा नक्षत्र ज्येष्ठा श्रेष्ठा ।।  
गणेशा सहित गौरी धनिष्ठा ।  
बैसली येउनि सकळिया निष्ठा ।।१।।  
जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी, श्री महालक्ष्मी,  
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेवी  
जयदेवी ।। धृ।।

गौरी पूजा पद्धती: परंपरा सर्वीकडे वेगवेगळी आहे. काही कुटुंबांमध्ये गौरीचा मुखवटा आहे, तर काही पारंपारिकपणे जलाशयातून पाच, सात किंवा अकरा खडे वा दगड घेऊन त्यांना गौरीस्वरुप मानून पूजा करतात. काही ठिकाणी पाच भांडी उतार असून त्यावर गौरी मुखवटे लावले जातात. तर काही घरांमध्ये गहू, तांदूळ, ज्वारी, हरभरा, डाळी इत्यादी धान्याच्या ढीग साचून झाकलेले असतात. तर गौरीची चित्रे किंवा पत्रके देखील उपलब्ध आहे. ज्यांची मनोभावे पूजा केली जाते. हे पूजन करण्याच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये परंपरेनुसार धातूची, मातीची प्रतिमा किंवा कागदावर श्री गौरीचे चित्र काढून, तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन केले जाते. अनेक ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी धातूच्या कोठ्यांवर मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुले येणार्या वनस्पतीची रोपे अथवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा तयार करतात आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात.

पौराणिक कथा: या अनुसार असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया आपले सौभाग्य अक्षय करण्यासाठी गौरीला शरण गेल्या. तिची प्रार्थना केली तेव्हा श्री गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार करून पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले. अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. याला गौरी गणपती किंवा महालक्ष्मी पूजन देखील म्हटले जाते.

ज्येष्ठा नक्षत्र पुजेचा महिमा ।  
षडरस पक्वान्ने होती सुखधामा ।।  
सुवासिनी ब्राह्मण अर्पुनी निजनेमा ।  
तुझे आशीर्वादे सकलही धामा ।।२।।  
जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी, श्रीमहालक्ष्मी,  
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेवी  
जयदेवी ।। धृ।।

गौरी आवाहन- १ला दिवस: परंपरेनुसार ज्या महिला गौरी घरात घेऊन येतात त्यांचे पाय दुध आणि कोमट पाण्याने धुतले जातात आणि त्यांचा पायावर कुंकवाने स्वस्तिक काढलं जातं. घराच्या दारापासून लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवतात. घरात येताना पावलांवरुन गौरींचे मुखवटे आणतात. शंख वाजवून गौरीचं घरात आगमन केलं जातं. लक्ष्मी आली सोन्याच्या पावलांनी... असे म्हणज गौरी स्थापना करण्यापूर्वी त्यानं संपूर्ण घरात मिरवत घरातील समृद्धी, दुध-दुभत्याची जागा व इतर गोष्टी दाखविण्याची प्रथा असते. मग देवघरासमोर लक्ष्मीचे आगमन करुन घरात ऐश्वर्य नांदो आणि वैभव निर्माण होवो, सुख-समृध्दी येवो अशी प्रार्थना केली जाते. रूढीप्रमाणे मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवतात. गौर सजवल्यानंतर शुभ मुहूर्तात गौरी बसवितात.

गौरी पूजन- २रा दिवस: दुसर्या दिवशी ज्येष्ठा नक्षत्रावर गौरींचे महापूजन होतं. या दिवशी पाना-फुलांची आरास करतात, शेवंतीची वेणी माळवतात. हार, चाफ्याचे फूल, केवड्याचे पान वाहतात. गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसर्या दिवशी ज्येष्ठ नक्षत्रावर महालक्ष्मीची पूजा करतात व महानैवेद्य दाखवितात. माहेरी आलेल्या गौरीला विशिष्ट प्रकाराचे पदार्थ खाऊ घालण्याची पद्धत आहे. गौरींना वेगवेगळे फळे अर्पण केली जातात आणि धान्यांच्या राशी लावल्या जातात. अनेक ठिकाणी आपल्या परंपरेनुसार नैवेद्याचा फुलोरा तयार केला जातो. माहेरवाशीण ज्येष्ठ गौरीला पुराणाचा नैवेद्य दाखवतात. नैवेद्याला १६ भाज्या, १६ कोशिंबिरी, १६ चटण्या, १६ पक्वान्ने तसेच फराळाचे पदार्थ करतात. पुरणाची १६ दिव्यांनी आरती करतात. संध्याकाळी हळदी-कुंकवाचा समारंभ केला जातो. अनेक जागी रात्री झिम्माफुगड्या, घागरी फुंकणे असे खेळ खेळून जागरण केले जाते.

उत्थापन मूळावर होता अगजाई ।  
वर देती झाली देवी विप्राचे गृही ।।  
रुद्र विश्वनाथ भक्ताचे ठायी ।  
वर देती झाली देवी सकळांचे गृही ।।३।।  
जयदेवी जयदेवी जय महालक्ष्मी, श्रीमहालक्ष्मी,  
कृपा करुनी आली तू महालक्ष्मी जयदेवी  
जयदेवी ।। धृ।।

गौरी विसर्जन- ३रा दिवस: तिसर्या दिवशी मूल नक्षत्रात गौरीचे खीर-कानवल्याचा नैवेद्य दाखवून विसर्जन करतात. या दिवशी कापसाचे गाठ बांधतात. सूतमध्ये हळद, कोरडे फळे, तमालपत्र, फुलं, झेंडूची पाने, काजूची फुलं, रेशीम धागा मिसळतात. गौरी पूजन करुन आरती करतात. परंपरेनुसार मुखवटे हालवण्यात येतात, खडे असल्या नदीत विसर्जन करून परत येताना नदीतील माती घरी आणून ती सर्व घरभर पसरवतात. दोरकाची पूजा: तिसर्याच दिवशी काही भागात गौरीच्या पूजेबरोबरच गुंडांना कापसाच्या सोळा गाठी देऊन पूजा करतात. तो गुंडा मग हळदीने रंगवून दोरा घरातील सुना-मुलींच्या गळ्यात बांधतात. अश्विन वद्य अष्टमीची गळ्यावरून काढून पूजा केली जाते. ही दोरी महालक्ष्मी असल्याचे समजले जाते.

**श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे,**  
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**  
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# चिंचखेडा येथील कार्यकर्ते शरद पवारांच्या राष्ट्रवादीत



**जाफराबाद- तालुक्यातील** मौजे चिचखेडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपाला सोडचिट्टी देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. यावेळी अरुण साबळे, प्रवीण मधुकर साबळे अजित शब्बीर सय्यद, गणेश रामकृष्ण साबळे, इनुस रहमान सय्यद, प्रवीण ज्ञानदेव साबळे, सांडू हसन पठाण, विजय रामकृष्ण साबळे, अल्ताफ पठाण, संदीप तायडे, निजाम पठाण, सारंगधर साबळे, शब्बीर सय्यद, मिलिंद चव्हाण, महमूद सय्यद, रब्बानी पठाण, गजानन साबळे, रमजान सय्यद, विनोद साबळे, आणि अनिल साबळे, जावेद सय्यद, सोमीनाथ हिवाळे, सलीम सय्यद, अहमद शेख, विजय साबळे, अहमद पठाण, जयेश साबळे, इस्माईल सय्यद, अजय साबळे, फारुख पठाण, तसलीम सय्यद, कुणाल साबळे, समीर सय्यद, पद्माकर साबळे, विजय सरोदे, सर्जेराव सरोदे, परमेश्वर साबळे, रमेश सरोदे, संतोष सरोदे यांनी प्रवेश केला. प्रसंगी तालुकाध्यक्ष रामधन कळंबे, रघुनाथ पंडित, गजू लोखंडे, अमोल शेळके, महेबुब शेख, दादाराव सरोदे, मोठेबा सरोदे, रामेश्वर सरोदे, संतोष मुळे, प्रफुल्ल सरोदे, भगवान सरोदे, शिवा लव्हाळे, संदिप पंडित, जगन पंडित, पुरुषोत्तम गाडेकर, प्रविण साबळे, अरुण साबळे, अजिस सय्यद, तोताराम घोडके, गुलाबराव सरोदे यांची उपस्थिती होती.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# प्रत्येक गावात मधुमेह निदान शिबिर घेण्यासाठी प्रयत्न करु-खोतकर

## शिबिरात ३३१ जणांची मधुमेह तपासणी तर २५० जणांचे स्वयंस्फूर्त रक्तदान

**जालना । प्रतिनिधी -** व्यायामाचा अभाव, वाढते ताणतणाव, बदललेली जीवनशैली, अनियंत्रित आहार आदी कारणामुळे मधुमेही रुग्णांची संख्या वाढते आहे. एरव्ही साठीत मधुमेह जडायचा. आता मात्र युवकांनाही तो जडतो आहे आणि प्रारंभीचे काही वर्ष याची जाणीव होत नाही. त्यामुळे उपचार होत नाहीत. परिणामी गुंतागुंत निर्माण होते. वेळीच निदान झाल्यास संभाव्य धोके टाळता येऊ शकतात. ही बाब विचारात घेता गावोगावी मधुमेह निदान शिबिरे घेण्याची गरज असून, रोटरी इंटरनेशनल डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठिया यांच्या सहकार्याने ग्रामीण भागात मधुमेह शिबिरे घेण्याला प्राधान्य देऊ, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा शिवसेनेचे उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलताना केले.

जालनासह ११ जिल्ह्याचा समावेश असलेल्या रोटरी प्रांतात मधुमेह तज्ञ डॉ. राजेश सेठीया यांच्या माध्यमातून मधुमेह निदानासाठी 'अबकी बार, एक लाख पार' हे विशेष अभियान राबविण्यात येत असून, त्यांअंतर्गत ५ सप्टेंबर रोजी शहरातील श्री पंचमुखी महादेव मंदिरसमोर आयोजित मधुमेह निदान व रक्तदान शिबिराचे उद्घाटन श्री. खोतकर यांच्याहस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी डॉ. राजेश सेठीया, रोटरी क्लब जालना रेनबोचे अध्यक्ष महेश माळी, सचिव गौरव करवा यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री. खोतकर पुढे म्हणाले की, युवा पिढीतही मधुमेहाचे रुग्ण आढळून येणे ही चिंताजनक बाब आहे. काही लक्षणे दिसत नसल्याने मधुमेह असल्याची जाणीवच अनेकांना होत नाही. मधुमेहाच्या उंबरठ्यावर असलेल्यांना वेळीच उपचार मिळाल्यास मधुमेह रुग्ण बनण्यापासून त्याला वाचविता येऊ शकते. मात्र, त्यासाठी निदान होणे गरजेचे असते. मात्र, माझे काय वय झाले का?, मला तर कोणतीही लक्षणे दिसत नाहीत, अशी मनाची समजूत काढून अनेक जण स्वतःहून निदान करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. मात्र, रोटरीने मधुमेह निदानासाठी एक लाख मोफत तपासणी करण्याचा घेतलेला निर्णय खरोखरच स्तुत्य आणि त्याबरोबरच काळाची गरज आहे. त्यामुळे आपणही ग्रामीण भागात अशी मधुमेह निदान शिबिरे घेण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.



याप्रसंगी डॉ. सेठीया व त्यांच्या टीमने या शिबिरात ३३१ जणांची मधुमेह तपासणी केली. रक्तदान शिबिरात २५० जणांनी स्वयंस्फूर्त रक्तदान केले. तपासणी करणाऱ्यांत १५ टक्के जणांना मधुमेह असल्याचे तर तेवढेच प्रीडायबेटिक असल्याचे निदान झाले, अशी माहिती डॉ. सेठीया यांनी दिली. मधुमेहाचा वाढता विळखा विचारात घेता वेळीच निदान व्हावे यादृष्टीने रोटरी परिवार व सौ. जमनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने शिबिरे आयोजित केली जात असून, त्यात तपासणी करून घ्यावी, डॉ. सेठीया म्हणाले.

या शिबिरासाठी संतोष तिवारी, केतन शहा, कृष्णा खोतकर, जनार्धन खोतकर आणि रुबी हॉस्पिटलच्या टीमने विशेष परिश्रम घेतले.

### खोतकरांनी स्वतः केली शिबिरार्थींची नोंदणी

या शिबिराचे उद्घाटन झाल्यानंतर माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी पूर्णवेळ या ठिकाणी थांबून शिबिरासाठी येणाऱ्यांची स्वतः नाव नोंदणी केली. सोबतच मधुमेह निदान करून घेण्यासाठी प्रोत्साहित केले. सध्या गणेशोत्सव सुरू असून, शेवटचे चार दिवस बडी सडकवर गणपती पाहण्यासाठी मोठी गर्दी उसळते. ही बाब विचारात घेता, गणेश मंडळांनी अशाप्रसंगी मधुमेह निदान शिबिराचे त्या ठिकाणी आयोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# जाफराबाद येथे चंद्रकांत दानवे यांच्या नेतृत्वात आक्रोश मोर्चा

जाफराबाद । प्रतिनिधी - येथील तहसील कार्यालय येथे प्रमोद फदाट यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा व त्यांनी केलेल्या आमरण उपोषणाची प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय जाफराबाद पर्यंत माजी आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे, काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, रमेश गव्हाड, युवा नेते सुधाकर दानवे,,जाफराबाद ता अध्यक्ष रामधन कळंबे, शिवसेना ता अध्यक्ष पुंडलिक मुद्दे, आय काँग्रेस ता अध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे तसेच आजी माजी पदाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचा विराट आक्रोश मोर्चा काढण्यात आला. प्रसंगी जाफराबाद मतदार संघातील हजारो कार्यकर्ते तथा पदाधिकरी विराट आक्रोश मोर्चेमध्ये सहभागी झाले होते. जाफराबाद तहसीलदार यांना रितसर निवेदन देऊन त्यांनी संबंधित मागण्या मान्य करत प्रमोदजी फदाट यांनी माजी आ. चंद्रकांत दानवे यांनी ज्यूस देऊन प्रमोद फदाट यांनी आमरण उपोषण मागे घेतले.




# मुसळधार पावसाची शक्यता; नागरिकांना दक्षता घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** मुंबई येथील कुलाबा प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात यलो अलर्ट जारी केला असुन विजेच्या कडकडाटासह दि. ११ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे, तरी जिल्ह्यातील नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मेघगर्जनेच्या वेळी, विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असतांना झाडाखाली किवा झाडांजवळ उभे राहु नये. विजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या / लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्याच्यामध्ये झाकावे, जमिनीशी कमीतकमी संपर्क असावा.

पान १ व ४ वरुन

## अंगणवाडी सेविका ...

अशी सामाजिक कार्यक्रमात भाग घेतला पाहिजे, समाजाचा विकास समाजाची उन्नती आणि समाजामध्ये अशा सामाजिक उपक्रमाने कार्य केलं पाहिजे हे आजच्या काळाची गरज ओळखून टेंभुर्णी येथील राजे शिवाजी गणेश मंडळाचा उपक्रम हा स्तुत्य असून असे सर्वच गणेश मंडळांनी उपक्रम राबविले पाहिजे ज्यापासून समाजाला फायदा होईल समाजामध्ये बदल घडून येतील. याप्रसंगी, रामधन पाटील कळंबे, पांडुरंग बोरसे, भोपळे सर विष्णू जोशी,इंगळे, राजे शिवाजी गणेश मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते संदीप जाधव, शिवराज सपाटे, आधी सर्व कार्यकर्ते तसेच, सर्व सन्मान केलेल्या अंगणवाडी ताई अंगणवाडी मदतनीस यांचे आवर्जून उपस्थिती होती. त्यांना दिलेला सन्मान बद्दल त्या भावुक झाल्या आणि गणपतीने आशीर्वाद दिला अशी त्यांची भावना झाली. तसेच मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कारही करण्यात आला.

## शिक्षण विभागाच्या ...

तालुक्यातील इतर शाळांच्या तुलनेत अधिक गुण असणाऱ्या सदरील शाळेला ऑनलाईन नोंद करतांना सर्वात कमी गुण नोंदविण्यात आले आहेत. शाळांच्या गुणांची नोंद करतांना नजरचुकीने हा प्रकार घडल्याची कबुली तपासणी करणारे केंद्र प्रमुख बाबासाहेब तरवटे यांनी दिली आहे. शाळेवर हा अन्याय असल्याचे सांगत तातडीने ही चूक दुरुस्त करावी या मागणीसाठी दहिफळ भोंगाने येथील ग्रामस्थांनी परतूर येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर मंगळवारी ठिय्या आंदोलन केले. गट शिक्षणाधिकारी आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी जाणीवपूर्वक या बाबीकडे दुर्लक्ष करत आहेत. गावकऱ्यांना तोंड द्यावे लागेल या भीतीने गटशिक्षणाधिकारी संतोष साबळे कार्यालयाकडे फिरकलेच नसल्याचा आरोप आंदोलक गावकऱ्यांनी केला आहे. शिक्षण विभागाने ही तांत्रिक चूक दुरुस्त केली नाहीतर गुरुवार पासून गट शिक्षणाधिकारी कार्यालयात शाळा भरविण्याचा ईशारा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रल्हादराव भोंगाने यांनी दिला आहे. या आंदोलनात बळीराम कानडे,गणेश बागल,सुभाष भोंगाने,कृष्णा निचळ,प्रतिक भोंगाने,रघुनाथ भोंगाने,पवन बागल,प्रभाकर कानडे,माऊली बागल,राजेश बागल,पुंजाराम बागल,गजानन भोंगाने,विष्णू बागल,बालाजी बोडखे,पांडुरंग भोंगाने,मोहन बागल,राजेभाऊ भोंगाने,ज्ञानेश्वर बागल,शिवाजी बोडखे, श्रीरंग बागल,शरद बागल आदी गावकरी सहभागी झाले होते.

दहिफळ भोंगाने पश्चिम ही शाळा तालुक्यात नावाजलेली शाळा आहे. येथील गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे एकूण पटसंख्येच्या निम्मे विद्यार्थी बाहेर गावावरून ये - जा करतात. दोन्ही शिक्षक तळमळीने काम करतात. या योजनेत पहिल्या क्रमांकाने ही शाळा अव्वल येणार हे सर्वांना माहीत असताना शाळेला डावलण्यासाठी जाणीवपूर्वक ही खेळी केल्याचा आरोप शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बळीराम कानडे केला आहे.

प्राथमिक शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांच्याशी संपर्क साधला असता, या बाबत वरिष्ठ कार्यालयात कळविण्यात आले आहे. चूक दुरुस्त करण्याची विनंती करण्यात आली आहे. केंद्र प्रमुखाने ही चूक करायला नको होती. चूक दुरुस्त झाली नाही तर मी काही करू शकणार नाही अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

माझ्या स्तरावरून झालेली तांत्रिक चूक अनवधानाने झालेली आहे. या बाबत वरिष्ठ कार्यालयाला कळविले असून माहिती सुधारित करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे. लवकरच सुधारणा करण्यात येणार असल्याची माहिती केंद्र प्रमुख तरवटे यांनी दिली आहे.

## आमदार बबनराव ...

आमदार लोणीकर म्हणाले. पशुवैद्यकीय दवाखाने असतील ग्रामीण रुग्णालय असेल आरोग्य केंद्र असतील, इत्यादी मूलभूत सुविधा आपण सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध करून देऊ शकलो याचा आनंद असून आपल्या सर्वांच्या प्रेमानेच हे सगळे होऊ शकले असे यावेळी त्यांनी सांगितले

भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी मी आमदार लोणीकर यांच्याकडे ज्या ज्या मागण्या विकास कामाबाबतीत केल्या त्या सर्व मागणी आमदार लोणीकरांनी पूर्ण केले असल्याचे सांगतानाच खऱ्या अर्थाने सर्वसामान्य जनतेला, विकास आणि वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या माध्यमातून सक्षम बनविण्याचे काम आमदार लोणीकर यांनी केले असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी बोलताना केले

कार्यक्रमाचे संचालन तुकाराम सोळंके यांनी केले. यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यासह, भीम महाराज गणेश महाराज, गोपाळ महाराज जोशी, भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले तुकाअबा सोळंके जिल्हा परिषद सदस्य सुदाम प्रधान पंचायत समिती सभापती रंगनाथ येवले कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती रवींद्र सोळंके माणिकराव वाघमारे प्रदीप ढवळे व्यापारी महासंघाचे कृष्णा टेकाळे, खंडेराव पाटील, बाबाराव थोरात सरपंच शोभा चंद्रकांत मोरे जीवनराव येवले अशोकराव वाघमारे माणिकराव वाघमारे माऊली सोळंके,उपसरपंच नसरुल्ला काकड, उद्धवराव गुंजाळ, अमोल जोशी मधुकर मोरे रमेश थोरात श्रीधर गांजाळे गजानन लोणीकर सिद्धेश्वर केकान नंदकुमार गांजे बंडू मानवतकर बळीराम थोरात बाबा सोळंके, रमेश राठोड रावसाहेब आढे उमेश सोळंके,अल्ताफ कुरेशी सईद शेख, मारुती थोरात बबलू सातपुते रफिक राज असिफ कच्ची, सिताराम राठोड , किरण अंभोरे परमेश्वर केकान नागेश ढवळे अमोल पवार राजेंद्र बाहीती विष्णू शहाणे, सुमंत पाटील

तहसीलदार प्रतिभा गोरे गटविकास अधिकारी श्री राजेश तांगडे, अभियंता श्री सगरोळे ग्रामसेवक डी बी काळे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक माता भगिनींची उपस्थिती होती

### आष्टी येथील ग्रामदैवत श्रीखंडेश्वर मंदिर येथे विविध विकास कामांचा भूमिपूजन समारंभ

# आमदार बबनराव लोणीकर यांनी विविध धार्मिक स्थळांचा विकास करून धर्म रक्षणाची धुरा सांभाळली - महामंडलेश्वर मनीषानंद महाराज

**आष्टी । प्रतिनिधी -** आमदार बबनराव लोणीकर यांनी राजकारणाचा सम ाजासाठी उपयोग करून खऱ्या अर्थाने धर्म रक्षणाचे काम केले असल्याचे प्रतिपादन महामंडलेश्वर १००८ स्वामी मनीषानंद जी महाराज पुरी यांनी केले, ते आष्टी ता परतूर येथे ग्रामदैवत खंडेश्वर मंदिर येथे पर्यटन विकास योजनेच्या माध्यमातून त0३ कोटी ५४ लक्ष रुपये किमतीच्या कामाच्या भूमिपूजन समारंभ प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, धार्मिक अधिष्ठानाच्या माध्यमातून आचरणात शुद्धी येते ही शुद्धी येण्यासाठी आमदार लोणीकरांनी भाविक भक्तांसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल लोणीकरांचे कौतुक केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, धार्मिक व समाज उपयोगी विकास कामे करणाऱ्या माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांना आपण पाठबळ देऊन यापुढेही त्यांच्या हातून असेच कार्य घडावे यासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची आवाहन यावेळी बोलताना त्यांनी केले

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी, साधू संतांच्या आशीर्वादामुळेच आपण मतदारसंघातील ३०० गावांमध्ये सभामंडपाचे काम करू शकलो गावाला रस्त्याने जोडू शकलो, विविध योजनांच्या माध्यमातून सर्वसाम ान्य दिन दलित पीडितांना मदत करू शकलो असे सांगितले

पुढे आमदार लोणीकर म्हणाले की, नांगरतास येथील भव्य दिव्य सभागृह असेल तेथील भक्तांच्या सोयी सुविधा असतील यासाठी आपण 0२ कोटी रुपये निधी खेचून आणत या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्याचे सांगतानाच, काराळा करळेश्वर मंदिर असेल, दैठणा येथील गुरु गंगाभारती महाराज संस्थान असेल आष्टी येथील शेख बाबू दर्गा असेल, गणपती मंदिर असेल सिद्धेश्वर मंदिरा असेल, काळा म ारुती मंदिर असेल अशा प्रकारची अनेक विकास कामे आपण विविध धार्मिक



स्थळी केली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले

आष्टी व परिसरासाठी गेल्या पाच सात वर्षात ३०० कोटी रुपयांच्या निधीची विकास कामे झाली असून आष्टी शहरांम ध्ये प्रत्येक गल्लीमध्ये गुडघाभर चिखल असायचा मात्र आपण मंत्री झाल्यानंतर आष्टी शहरातील प्रत्येक रस्ता बांधून या ठिकाणी सुविधा उपलब्ध करून दिले असल्याचे **पान ३ वर**

## मुख्यमंत्री योजनादूत व्हा; दहा हजार महिना कमवा

**मुंबई । प्रतिनिधी -** शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज म ागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५0 हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १0 हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उम ेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.



मंठ्यातील सुगंधानगर येथील जयश्री राम मंडळाची गणेश मूर्ती

